एक सुर एक तालसह वसुंधरा बचावाचा केला संकल्प

पनवेल :

अखिल भारतीय युवक काँग्रेसच्या स्थापनानिमित्त मावळ लोकसभा युवक काँग्रेस, पनवेल व उरण विधानसभा युवक काँग्रेसच्या वतीने वसुंधरा बचाव संकल्प नृत्य–गान कार्यक्रम शनिवारी (दि. ९) येथे झाला. आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झालेल्या 'एक सुर एक ताल' या कार्यक्रमाच्या माध्यमातून वसुंधरा बचावाचा संकल्प करण्यात आला.

ऑगस्ट क्रांती दिनाचे औचित्य साधून करण्यात आलेल्या या आगळ्या वेगळ्या कार्यक्रमाला रसिकांचा उदंड प्रतिसाद लाभला. लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, कामगार नेते महेंद्र घरत, ज्येष्ठ नेते डॉ. भक्तीकुमार दवे, युवा नेते परेश ठाकूर, बांधकाम सभापती राजू सोनी, ज्येष्ठ नेते शशीकांत बांदोडकर, अरविंद सावळेकर, जि.प. सदस्य राजेंद्र पाटील, मावळ लोकसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष किशोर चौतमल, पनवेल विधानसभा युवकचे दशरथ म्हात्रे, उरण विधानसभा युवकचे जितेंद्र घरत, पनवेल शहर काँग्रेसचे अध्यक्ष जयंत पगडे, मयुरेश नेतकर, लतिफ शेख, आरोग्य सभापती अनिल भगत, उरण महिला काँग्रेसच्या अध्यक्षा सीमा घरत, विक्रांत घरत, रवि नाईक, प्रितम म्हात्रे, परेश घरत, रितु सिंग, के. एस. पाटील आदी उपस्थित होते.

युवकांना व्यासपीठ निर्माण करून देण्यासाठी त्याचबरोबर नेतृत्व गुणाला वाव देण्यासाठी युवक काँग्रेसची स्थापना करण्यात आली होती. काँग्रेस पक्षाला बळकट करण्यासाठी त्याचबरोबर युवकांना एकत्रित करून त्यांची संघटना मजबूत करण्याचे काम युवक काँग्रेसच्या माध्यमातून गेली अनेक वर्षे सुरू आहे.

अखिल भारतीय युवक काँग्रेसच्या स्थापना दिवसाच्या निमित्ताने आज देशभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पनवेलमध्ये युवक बिरादरीने 'एक सुर एक ताल' या कार्यक्रमासह वसुंधरा बचावचे महत्त्व उपस्थितांना पटवून दिले.

वसुंधरा म्हणजे पृथ्वी. या पृथ्वीवर विविध प्राकृतिक विभाग आहेत. त्यात जमीन, डोंगर, पर्वत, नद्या, समुद्र यांचा समावेश आहे. पर्यावरण हा वसुंधरेचा गाभा आहे. मानवी हस्तक्षेपामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडत चालले असून त्यामुळे वसुंधरेला धोका निर्माण झाला आहे. आपली पृथ्वी सुरक्षित रहावी या करीता पर्यावरणाचा समतोल राखणे ही काळाची गरज झाली आहे. अगदी याच उद्देशाने आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुढाकार घेऊन वसुंधरा बचाव संकल्प नृत्य–गानचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात सीकेटी कॉलेज, महात्मा फुले कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय, शिक्षण महर्षि दादासाहेब लिमये विद्यालय कळंबोली या विद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले होते. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरी' या उक्तीप्रमाणे 'झाडे लावा, झाडे जगवा' असा संदेश कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना देण्यात आला. त्या आशयाची शपथ उपस्थितांना देण्यात आली. यावेळी 'जीवन जल है जलसे जीवन' या गाण्यावर भाव अभिव्यक्ती करीत सर्वांना पाणी बचतीचा संदेश देण्यात आला. त्याचबरोबर 'दिलसे दिल मिलायेंगे एक है हम दिखाऐंगे' या गीतावर सर्वांनी ठेका धरला. या वेळी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनीही देशभक्तीपर गीत व कविता सादर केले.

चौकट

महाराष्ट्र गौरव गीताची छाप

युवा बिरादरचे प्रा. नागेंद्र राय, वतनदार, ऋषी चव्हाण, सुरेश रत्नपारखी, डॉ. राजेश उमाले, सर्वजित मौर्य, दिनेश गोरेगावकर, या कलाकारांनी 'इथून माझ्या सह्यगिरीला... धडक दिली अटकेला', हे महाराष्ट्र गौरव गाण्यावर बहारदार नृत्य सादर केले. या महाराष्ट्र गौरवगानची छाप संपूर्ण कार्यक्रमावर पडली.

चौकट

कार्यक्रमात भाव अभिव्यक्ती

वसुंधरेचा बचाव ही संकल्पना घेऊन पनवेलमध्ये  झालेला हा आगळा वेगळा कार्यक्रम सर्वांच्याच स्मरणात राहील. या वेळी नाट्यगृहात गुंजणारे ताल सुर लयावर भाव अभिव्यक्ती करत उपस्थितांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला.

कोट

९ ऑगस्ट हा क्रांतीदिन म्हणून आपण साजरा करतो. या वेळी ब्रिटिशांच्या विरोधात जो लढा पुकारला होता. त्यामध्ये अनेक नेत्यांची धरपकड झाली. तरीसुद्धा सर्वसामान्यांनी या आंदोलनाचे नेतृत्व करून 'करो या मरो'चा नारा दिला. अशा या क्रांतीदिनाचे औचित्य साधून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. जे देशासाठी लढले त्यांच्या बलीदानाचे स्मरण करण्याचा हा दिवस आहे.

– आमदार प्रशांत ठाकूर

––––

भारतीय फुलांप्रमाणे आज पनवेलचे नाट्यगृह फुलतांना दिसत आहे. इतके तन्मयी सर्वजण झाले आहेत. ती गोष्ट अभिमानस्पद आहे. देशाकरीता सर्व भेदभाव सोडून मी एक भारतीय नागरिक आहे हे समजून एकतरी झाड लावावे.

– लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर